समीक्षात्मक चर्चा :
मराठीतील बालसाहित्य

बुकवर्म लायब्ररी एज्युकेटर्स कोर्सच्या माजी विद्यार्थ्यांद्वारे आयोजित

Bookworm

१० ते १२ एप्रिल, २०२६

स्थळ व आयोजक : बिलीफ, नाशिक.

Better Education Lifestyle And Environment Foundation

Organisations : Participants

अधवन	मेघा, यास्मिन
बिलीफ	अतुल , मुक्ता , रसिका आणि मनिषा
बुकवर्म	सुजाता , दिक्षा , विश्वनाथ , अश्विनी आणि जेनिफर
कल्पकता	तोलेश
कथावट	प्रिया
प्रगत शिक्षण संस्था	विद्या
सजग	सजिता
उन्नती	हेमांगी

दिवस पहिला : १० एप्रिल, २०२६

बालसाहित्य म्हणजे काय आणि बालपण म्हणजे काय, यावर सर्वांची समान समजूत होईल या दृष्टीने प्रयत्न करून आम्ही सुरुवात केली.
सुजाताने सर्वांचे स्वागत करून संभाषणाला सुरवात केली. प्रत्येकाला त्यांच्या समजुतीनुसार बालसाहित्य म्हणजे काय हे सांगण्यासाठी आमंत्रित केले. अनेक कल्पना मांडल्या गेल्या, व खालील काही मुद्दे समोर आले ज्यावर सर्वांचे एकमत झाले:

- बालसाहित्य हे 14 वर्षांपर्यंतच्या कोणत्याही मुलासाठी आहे (गटातील काहींनी 16 किंवा 18 वर्षांपर्यंतच्या मुलांचा उल्लेख केला).
- ते मुलांसाठी लिहिले जाते, तरीही प्रौढांनाही ते आवडू शकते किंवा ते स्वतःला त्याशी जोडू शकतात.
- ते सहसा मुलांना 'आनंद' देते आणि विचार करायला उद्युक्त करते.
- त्यात प्रत्येक वेळी लहान मुलेच मुख्य पात्र असतील असे नाही.
- ते उपदेशात्मक नसावे, परंतु ज्या उद्देशाने आपण साहित्य मुलांपर्यंत पोहोचवतो तो ठराविक आणि वेगळा असतो तसेच तो केवळ वाचन कौशल्य शिकण्याच्या उद्देशापेक्षा विस्तृत असतो.
- म्हणूनच, साहित्यिक ग्रंथ हे वाचन पातळी वर्गीकृत पुस्तकांपेक्षा (graded readers) खूप वेगळे असतात – पातळी वर्गीकृत पुस्तकांचा उद्देश वाचन कौशल्य शिकवणे हा असतो.
- दुसरीकडे, साहित्याची भूमिका व्यापक असते ज्यामध्ये शिक्षण देणे, माहिती देणे, दृष्टिकोन तयार करणे आणि आपल्याला प्रश्न विचारण्यासाठी सक्षम करणे ह्यांचा समावेश असतो. साहित्य आपल्याला जग समजून घेण्यास तसेच नव्याने जगाविषयी विचार करण्यास मदत करते – त्याच्याशी संलग्न होण्यास, त्यातून बाहेर पडण्यास किंवा त्यावर प्रश्न विचारण्यास मदत करते.

दिवस पहिला : १० एप्रिल, २०२६

वाचनाचा उद्देश सर्वांसाठी स्पष्ट असला पाहिजे यावर सर्वांचे एकमत होते, परंतु सर्वानुमते मराठी भाषिक प्रकाशन क्षेत्रात तो उद्देश प्रत्येक वेळी/ कायम स्पष्ट दिसत नाही.

या सत्रातून काही प्रश्न समोर आले:

- मुलांनी काय वाचावे आणि ते काय वाचू शकतात हे कोण ठरवते?
- बालक किंवा लहान मुलं म्हणजे कोण आणि बालपण म्हणजे काय, हे बाजारपेठ ठरवत आहे का?
- बालपणाची ही संकल्पना संकुचित आणि एक-आयामी आहे की ती विविधता आणि भिन्नता विचारात घेते?
- तीस वर्षांपूर्वी, कदाचित आपल्या आई-वडिलांची पिढीसुद्धा प्रौढांसाठी असलेली पुस्तके वाचत असे – तेव्हा बालसाहित्याची कोणतीही वेगळी श्रेणी नव्हती. अलीकडे मुलांच्या विकास व वाढीच्या गरसमजुतींमुळे बालसाहित्याची अवाजवी निर्मिती होऊन दर्जा घसरला आहे का?
- आपण वाचनाचे वय आणि बालपणाबद्दलच्या पाश्चात्य संकल्पनांनी प्रभावित आहोत का? आंतरराष्ट्रीय पिक्चर बुक्स मध्ये सहसा वयोगटाचा उल्लेख नसतो, पण भारतीय पिक्चर बुक्स (चित्रपुस्तकांमध्ये) असतो – असे का?

बिलीफ टीम द्वारे केलेला डिस्प्ले

सादरीकरण १

सादरकर्ते : दीक्षा, अश्विनी, विश्वनाथ - बुक वर्म, गोवा.

मराठी बालसाहित्यातील मुख्य विषय (थिम)

या गटाने त्यांच्या ग्रंथालयातील तसेच गोव्यातील त्यांच्या परिसरातील दोन सार्वजनिक ग्रंथालयांमधील संग्रह चाळला, निवडला आणि वाचला. त्यांनी त्यांच्या वैयक्तिक संग्रहातील काही पुस्तकेदेखील वाचली, चाळली..

त्यानंतर समान विषय किंवा संकल्पना असलेल्या पुस्तकांची यादी तयार केली. मग त्या सर्वांनी पुस्तकातील पात्रांचे सादरीकरण, कथानक, पार्श्वभूमी, लेखकाची पार्श्वभूमी, भाषा आणि चित्रशैली इत्यादींवर चर्चा केली. या चर्चेतून आणि विश्लेषणातून समोर आलेली प्रमुख निरीक्षणे :

- नातेसंबंध, पर्यावरण आणि विज्ञान यांसारख्या विषयांवरील पुस्तकांची संख्या जास्त आहे.
- मृत्यू, विविध कुटुंबपद्धती, अपंगत्व, जात आणि भेदभाव यांसारख्या अधिक गुंतागुंतीच्या विषयांवर मूळ मराठीत लिहिलेली पुस्तके फार कमी किंवा अजिबात नाहीत.
- कथांमध्ये मुलांच्या तुलनेत मुलींचे चित्रण कमी आहे.
- त्याचप्रमाणे, अल्पसंख्याक धार्मिक समुदाय आणि उपेक्षित जाती-समूहांनाही पुस्तकांमध्ये कमी प्रतिनिधित्व मिळते.
- लैंगिकता किंवा नायक म्हणून नॉनबायनरी पात्रांवर आधारित कोणतीही पुस्तके आढळली नाहीत. पुस्तके मुख्यतः त्याच सामाजिक पद्धतींचेच पुनरुत्पादन करतात, ज्या प्रमाण मानल्या जातात.
- अकाल्पनिक पुस्तकांमध्ये विविधता आणि सखोलतेचा अभाव आहे – उदा. कलेवरील पुस्तके प्रामुख्याने ओरिगामी, हस्तकला इत्यादींसारख्या प्रक्रिया-पुस्तकांपुरती मर्यादित आहेत.
- गेल्या 25-30 वर्षांतील कथांमधील कुटुंबांच्या चित्रणाची थोडक्यात तुलना केल्यास असे दिसून आले आहे की, त्यात फारसा बदल झालेला नाही. बहुतेक पुस्तकांमध्ये आदर्श कुटुंबपद्धती आढळते. सामाजिक वास्तवाला गुंतागुंतीचे न बनवता, आज्ञाधारकपणा, दयाळूपणा, प्रामाणिकपणा आणि देशभक्ती यांसारख्या नैतिक मूल्यांवर भर दिला जातो.
- जर पुस्तकांमध्ये अपंगत्वासारखे विषय आलेच, तर ते सहसा सर्वसमावेशकता, अपंगभेद किंवा अपंगत्वाला सामान्य मानण्याऐवजी, त्यातून केवळ सहानुभूतीची भावना व्यक्त किंवा अधोरेखित होते.
- बहुतांश प्रकाशनांमधील चित्रांचा दर्जा अपुरा वाटतो आणि प्रकाशनामध्ये त्याला प्राधान्य दिले गेले नाही असे दिसते. काही पूर्वी प्रकाशित झालेल्या (जुन्या) पुस्तकांमध्ये कमी किमतीच्या/दर्जाच्या कागदावरील अस्पष्ट कृष्णधवल चित्रे किंवा रेखाचित्रे आढळली. नव्याने प्रकाशित झालेल्या पुस्तकांमध्ये कार्टूनसारख्या पात्रांचा वापर (बहुधा सहज उपलब्ध एआय किंवा मोफत क्लिप आर्ट वापरून) केल्याचे आढळले. या दोन्ही गोष्टी मुलांच्या समृद्ध वाचनानुभवात भर घालत नाहीत.

- लेखकांची मुले आणि बालपणाबद्दलची संकल्पना मर्यादित दिसते. वाचकाची बौद्धिक क्षमता किंवा विचार करण्याची क्षमता अनेकदा कमी लेखली जाते आणि तिला वरचढ नजरेने बघितले जाते. मजकुरातून विचार करण्यासाठी मुलासमोर सहसा कोणतेही खुले प्रश्न किंवा मुद्दे ठेवले जात नाहीत. मुलाला बहुतेकदा काहीतरी सांगितले जाते, शिकवले जाते किंवा नवीन माहिती उपदेशात्मक पद्धतीने दिली जाते..
- मराठीत लिहिलेल्या मूळ कथांची संख्या कमी आहे – प्रथम आणि तुलिका यांसारख्या लोकप्रिय प्रकाशकांकडे अनुवादित कथांची संख्या (अनुवादाच्या विविध गुणवत्तेसह) खूप जास्त आहे .
- चिकू पिकू / कुल्फी यांसारख्या काही नवीन मासिकांमध्ये आढळणाऱ्या विषयांच्या तुलनेत पुस्तकांमध्ये सादर होणाऱ्या विषयांची विविधता कमी आहे.

टीम बुकवर्म सादरीकरण करताना

या सादरीकरणाच्या शेवटी समोर आलेले काही प्रश्न:

- अल्पसंख्याक समुदायांतील लेखकांना प्रमुख प्रकाशकांमार्फत त्यांची पुस्तके प्रकाशित करण्याची संधी मिळते का? अल्पसंख्याक समुदायातील लेखकांना प्रबळ संख्यांक समुदायातील लेखकांइतकीच प्रसिद्धी मिळते का? प्रकाशन उद्योगात कोणाचे स्वागत केले जाते, की तिथे प्रवेशबंदी आहे?
- लेखक घडवण्याची जबाबदारी कोणाची आहे?
- अधिक मुलांना आणि त्यांच्या विविध बालपणाला लक्षात घेऊन, अधिकाधिक लोकांना कथा लिहिण्यास सक्षम करण्यासाठी आपण व्यासपीठ/अभ्यासक्रम कसे तयार करू शकतो?
- बाजारात अनेक कमी किमतीची पुस्तके आहेत – ती फक्त एक उणीव भरून काढत आहेत का आणि त्यांना नाकारले पाहिजे का - कारण ते पुस्तकांचा दर्जा कमी करत आहेत?
- लेखनासाठीच्या अनुदानांवर/फेलोशिपवर होणारे निर्बंध आपण कसे थांबवू शकतो? आपल्या स्वतःच्या नेटवर्कमधून अनुदान किंवा फेलोशिपचा प्रसार करून या क्षेत्रात काम करणाऱ्या अधिक मोठ्या/विस्तृत वर्गापर्यंत पोहोचण्यासाठी आपण माध्यम कसे बनू शकतो? केवळ समान वर्तुळांमध्ये माहिती प्रसारित करण्यापापेक्षा सर्व वर्तुळांमध्ये पद्धतशीर प्रसार आपण कशा प्रकारे करू शकतो?
- प्रकाशन उद्योगावर कोणाचे नियंत्रण आहे? आपण ब्राह्मणी वर्चस्व कसे मोडून काढू शकतो?

“कार्यशाळेपूर्वी मी माझ्या टीमसोबत या विषयावर अभ्यास करत असताना, मला 'मराठी बालसाहित्य'ची नेमकी व्याख्या सापडली नाही. त्यामुळे ते आमच्यासाठी स्पष्ट नव्हते आणि आमच्या मर्यादित ज्ञानामुळे असे होत आहे, असे आम्हाला वाटले. कार्यशाळेदरम्यान सुरू झालेल्या चर्चेतून हे स्पष्ट झाले की, हा विषय खरंच अस्पष्ट आणि अनिश्चित होता. त्यामुळे मला वाटले की, जर आपल्याकडे एखादा महत्त्वाचा मुद्दा असेल, तर आपण त्यावर ठाम असले पाहिजे आणि तो मोकळेपणाने मांडण्यासाठी व त्यावर एकत्रितपणे चर्चा करण्यासाठी अशी व्यासपीठे एक उत्तम संधी आहेत.”

– विश्वनाथ

सादरीकरण २

सादरकर्ते : मेघा, अधवन, मुंबई.

मराठी बालसाहित्यातील स्वरूप आणि प्रकार

संस्थेच्या ग्रंथालयातील संग्रह आणि आपल्या टीमसोबत झालेल्या चर्चेच्या आधारे, मेघाने उपलब्ध असलेल्या विविध साहित्य प्रकार आणि स्वरूपांची उदाहरणे मांडली. सर्वेक्षण केलेल्या प्रकाशकांमध्ये – प्रथम बुक्स, ज्योत्स्ना प्रकाशन, राजहंस प्रकाशन आणि एकलव्य पब्लिकेशन यांचा समावेश होता. मासिकांमध्ये – कुल्फी आणि चिक्कू-पिकू यांचा समावेश होता.

प्रमुख निरीक्षणे :

- विविध प्रकाशकांमध्ये विषय आणि साहित्य प्रकारांमधील विविधता खूपच मर्यादित आहे.
- सापडलेली पुस्तक स्वरूपे (फॉरमॅट्स) खालीलप्रमाणे होती व त्यांचे प्रमाण असमान होते.
    - चित्रपुस्तके (पिक्चर बुक) - (तुलनेने कमी)
    - बोर्ड बुक्स (जाड पुठ्ठयाची पुस्तके) - (खूप कमी)
    - शब्दरहित पुस्तके - (जवळ जवळ नाही , फक्त अनुवादीत)
    - वाचन पातळी वर्गीकृत पुस्तके (Graded Readers)
    - प्रकरण पुस्तके
    - कृती पुस्तके
    - कोडी/विनोद
- सापडलेले साहित्य प्रकार होते
    - वास्तववादी कथा
    - प्राणीमात्रांवर आधारित काल्पनिक कथा
    - परीकथा आणि बोधकथा
    - पुराणकथा
    - कविता
- अ-काल्पनिक साहित्य प्रकारात, विशेषतः माहितीपूर्ण पुस्तकांमध्ये, एक मोठी उणीव दिसून येते - ती म्हणजे विश्वकोशांचा अभाव. याशिवाय, चरित्रांसारखा अत्यंत लोकप्रिय साहित्यप्रकारसुद्धा केवळ चित्रपुस्तकांच्या स्वरूपात मर्यादित होता आणि त्या प्रदेशाचा इतिहास इतका समृद्ध व गुंतागुंतीचा असूनही, तथ्यांवर आधारित काल्पनिक साहित्य (fact fiction) जवळजवळ नव्हतेच.

सादरीकरण ३

सादरकर्ते : अतुल, बिलिफ, नाशिक

मराठी बालसाहित्यातील अनुवाद

ग्रंथालयातील संग्रह, मराठी बालसाहित्यातील अनेक वर्षांच्या अनुभवावर आधारित मराठीत उपलब्ध असलेल्या पुस्तकांविषयीची माहिती आणि टीमसोबत झालेल्या चर्चेच्या आधारे, अतुलने अनुवादित पुस्तकांचे दोन प्रकारे विश्लेषण करून सादरीकरण केले. त्याने अनुवादातील स्रोत-केंद्रित (विंडो) दृष्टिकोन आणि लक्ष्य-केंद्रित (मिरर) दृष्टिकोनाबद्दल माहिती दिली. त्याने आम्हा सर्वांना विचार करण्यासाठी- Polysystem Theory of Literature एक सैद्धांतिक चौकटही सादर केली आणि ती अनुवादांना कशी लागू होते हे मांडले.

काही विशिष्ट पुस्तकांचे विश्लेषण करून त्याबद्दल माहिती दिली व खालील निष्कर्ष/ निरीक्षणे सादर केली.

- प्रथम आणि ज्योत्स्ना यांसारखे प्रकाशक महाराष्ट्रातील संस्था असूनही मूळ मराठीत प्रकाशित होणाऱ्या पुस्तकांचे प्रमाण कमी आहे.
- अनुवादांच्या गुणवत्तेत अनेक समस्या आणि तफावत आहेत. सादर केलेल्या उदाहरणांमध्ये आणि विश्लेषणात 'क्यों क्यों लडकी', 'द वॉटर मेलन रुट' यांचा समावेश होता. असे दिसते की, मराठीत भाषांतर करताना मूळ मजकुरात काही प्रमाणात फेरफार केली जाते किंवा काही गोष्टी वगळल्या जातात आणि त्यामुळे कथेचे वैभव/ मूळ गोडी नष्ट होते.
- भाषांतरे प्रमाण मराठीकडे झुकलेली आहेत (जी अनेकदा बोलचालीच्या मराठीपेक्षा वेगळी असते) – जे अनेकदा प्रकाशकांचे वर्चस्व दर्शवते.
- भाषांतरांमध्ये बदलणारे किंवा कमी होणारे इतर पैलू म्हणजे फॉन्ट, मजकुराची मांडणी आणि प्रूफरीडिंग.
- गुणवत्तेनुसार भाषांतरांचा क्रम असा असू शकतो:
  - ज्योत्स्ना
  - प्रथम
  - एनबीटी
  - तुलिका

या सादरीकरणाच्या शेवटी समोर आलेले काही प्रश्न:

1. भाषांतरांमध्ये काय बदलायचे हे कोण ठरवते? आणि का?
2. या पुस्तकांचे भाषांतर कोण करते? ती कुठून येतात? त्या भागातील स्थानिक मराठी व लोकांविषयी त्यांची काय कल्पना व समज असते?
3. मुलांना बालपुस्तकांमध्ये काय हवे आहे, हे मुलांनाच विचारता येईल काय? (विद्याने मुलांसोबत घेतलेल्या फोकस ग्रुप चर्चेचे उदाहरण दिले – मुलांनी उल्लेख केलेल्या गोष्टींपैकी एक म्हणजे चुका नसलेली पुस्तके / उत्तम प्रकारे प्रूफरीड केलेली पुस्तके)
4. आपल्या मुलांनी बोललेल्या इतर भाषांमध्ये अधिक पुस्तके असू शकतात का? पुन्हा एक उदाहरण म्हणजे मुलांना गोष्टी लिहायला / तयार करायला सांगणे.
5. मुलांसाठीच्या मराठी पुस्तकांचा, भाषांतरित पुस्तकांसहित, असलेला कमी दर्जा हा मराठी बालवाचनाबद्दल किंवा मराठी वाचकांविषयीची बाजारपेठेची समज याबद्दल काय सांगतो?

टीम बिलीफ सादरीकरण करताना

सादरीकरण ४

सादरकर्ते : तोलेश, कल्पकता, नागपूर .

वयोगटानुसार प्रकाशनातील उणिवा

कल्पकता सामुदायिक ग्रंथालयातील आपल्या ग्रंथालय कार्यादरम्यान तोलेश यांच्या लक्षात आले की, माध्यमिक शाळेतील मुलांसाठी पुरेशी आणि योग्य पुस्तके शोधण्यात त्यांना अडचण येते. आपल्या संस्थेतील संग्रह आणि प्रकाशनांसह पुस्तकांची एकूण उपलब्धता यांवर आधारित, त्यांनी वयोगटानुसार जाणवलेल्या मराठी बालसाहित्यातील उणिवा ओळखल्या व सादर केल्या. काही प्रमुख निरीक्षणे :

- मराठी बालसाहित्यात वयोगटानुसार वर्गीकरणाचा अभाव दिसतो. ते असायलाच पाहिजे की नाही याबद्दल संपूर्ण खात्री नाही पण ते असमान आहे.
- प्रकाशक अनेकदा 'एकच साचा सर्वांना लागू' हा दृष्टिकोन स्वीकारतात असे दिसते.
- लहान वयोगटासाठी (3-6 वर्षे) अनेक पुस्तके आहेत - प्रामुख्याने बोधकथा, व्यक्तिचित्रण कथा इत्यादी. मोठ्या मुलांसाठीच्या पुस्तकांमध्ये विविधता कमी आहे.
- व्यक्तिचित्रणापासून सामाजिक दृष्टिकोनाकडे वळणारी/ वळवणारी पुस्तके खूप कमी आहेत.
- कथा/पुस्तकांची लेखनशैली देखील कमकुवत आहे – एका गटचर्चेत मुलांनी सांगितले की काही कथा खूपच भावनिक वाटतात आणि कथानकाचा शेवट कृत्रिम वाटतो.

मुलांना प्रश्न विचारण्यास प्रोत्साहित करणारी पुस्तके खूप कमी आहेत. वर्गाला त्याची माहिती मिळू शकेल.

- इयत्ता 7/8 नंतर मुले ग्रंथालयात येणे का थांबवतात? चित्रपुस्तकांपासून प्रकरणपुस्तकांपर्यंतचा प्रवास अनियमित आहे. मोठ्या मुलांसाठी विषय, स्वरूप आणि शैलीमध्ये विविधता खूप कमी आहे. या वयोगटासाठी अशी कोणतीही पुस्तके नाहीत जी त्यांना वाचनात गुंतवून ठेवू शकतील, जशी इंग्रजीमध्ये किशोरवयीन साहित्य मुबलक उपलब्ध आहे.
- मराठी बालसाहित्यातील अभ्यासकार्य कमकुवत आहे किंवा ते व्यापकपणे उपलब्ध नाही किंवा वाचण्यासाठी सहज उपलब्ध नाही. प्रकाशनातील सध्याच्या प्रवाहांचा अभ्यास करण्याची आणि मुलांच्या आवडीनिवडी समजून घेण्याची गरज आहे, जेणेकरून प्रकाशन वर्गाला त्याची माहिती मिळू शकेल.



सादरीकरण ५

सादरकर्ते : प्रिया, कथावट, पुणे.

अभिजात विरुद्ध समकालीन साहित्य

कथावट ग्रंथालयातील संग्रह आणि मराठी साहित्याविषयीची स्वतःची समज व अनुभव यांच्या आधारे, प्रियाने मराठीतील अभिजात साहित्यापासून ते समकालीन बालसाहित्यापर्यंत झालेले बदल ओळखण्याचा प्रयत्न केला. प्रियाने एक माहिती संकलन आराखडा फॉर्म स्वरूपात तयार केला आणि तो तिच्या मराठी वाचक व ग्रंथपालांच्या नेटवर्कमध्ये वितरित केला. मिळालेल्या प्रतिसादांच्या आणि इंटरनेट वर उपलब्ध काही साहित्य समीक्षेच्या आधारे, तिने निरीक्षणे आणि निष्कर्ष सादर केले.

- मराठी बालसाहित्याचा उगम- मौखिक परंपरेतून
- अभिजात साहित्याचा अर्थ/व्याख्या शोधली - ज्या पुस्तकांना सांस्कृतिक किंवा पारंपरिक मुळे आहेत
- अभिजात लेखक आणि साहित्यकृतींची ओळख/ काही उदाहरणे:
    - साने गुरूजी (श्यामची आई)
    - ना धो ताम्हणकर (गोट्या)
    - ची वी जोशी (चिमणराव)
    - ग्रामीण लेखक- व्ही. माडगूळकर, शंकर पाटील, द मा मिरासदार
- मराठी बालसाहित्याच्या अभिजात ते समकालीन अशा स्थित्यंतरात, नायकाचे स्वरूप 'आज्ञाधारक आदर्श बालका'कडून 'खोडकर, चंचल, विचारशील बालका'कडे बदलल्याचे दिसून आले.
- मराठी अभिजात बालसाहित्याचे दस्तऐवजीकरण करणाऱ्या सर्वोत्कृष्ट साहित्यकृतींपैकी एक म्हणजे माधुरी पुरंदरे यांची 'वाचू आनंदे - चार भाग' ही रचना. इतके सकस काम असूनही, शिक्षणतज्ज्ञ आणि प्रकाशकांच्या दृष्टिकोनातून याला एक शैक्षणिक किंवा संदर्भ दस्तऐवज म्हणून मान्यता मिळालेली दिसत नाही. हे केवळ वाचनासाठी व अभिजात ग्रंथांचा संग्रह किंवा संदर्भ देण्यापुरतेच मर्यादित आहे.
- अभिजात विरुद्ध समकालीन यावर चर्चा करताना आपल्याला पिढ्यांमधील अंतर आणि कालखंडही लक्षात ठेवावे लागतात; त्यामुळे त्यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

टीम सजग सादरीकरण करताना

दिवस दुसरा : ११ एप्रिल, २०२६

दिसवासाची सुरुवात मागील दिवसाचा आढावा घेऊन त्यातील विचार पुन्हा एकदा आठवून केली. यावेळी मराठी बालसाहित्यावर एकत्र विचार करण्यासाठी मिळालेल्या वेळेचे आणि जागेचे सर्वांनी कौतुक केले. या संधीमुळे सर्वांना एक अत्यंत आवश्यक सामुदायिकतेची भावना मिळाली आणि उपाय शोधण्याकडे वाटचाल करण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल समस्यांना 'समस्या म्हणून पाहणे' महत्वाचे आहे हे जाणवले.

सादरीकरण ६

सादरकर्ते : सजिथा, सजग ट्रस्ट , ठाणे

बालसाहित्यातील प्रतिनिधित्व (कोणाची कथा सांगितली जात आहे?)

या सादरीकरणात सजगने त्यांच्या ग्रंथालयातील 50 मराठी पुस्तकांचे पुनरावलोकन करून, उपलब्ध पुस्तकांमधील प्रतिनिधित्वाच्या विविधतेचे विश्लेषण सादर केले. माहिती संकलनासाठी एका पद्धतशीर प्रश्नावली साधनाचा वापर करून केलेल्या विश्लेषणातून असे दिसून आले की, चित्रपुस्तकांमध्ये एका गोऱ्या, मध्यमवर्गीय, हिंदू मुलाचे प्रतिनिधित्व प्रामुख्याने आढळते. हे आजच्या मराठी बालसाहित्यातील मोठी उणीव दर्शवते. सजगच्या या अभ्यासाने कार्यशाळेतील सर्व सहभागींना त्यांच्या स्वतःच्या ग्रंथालयातील पुस्तकांकडे या दृतिकोनातून पाहण्यास आणि मराठी बालसाहित्यातील विविधतेच्या प्रश्नाचा शोध घेणारा अधिक तपशीलवार आणि पद्धतशीर अभ्यास करण्यास प्रेरित केले आहे. तात्पुरते कार्य शीर्षक आहे:

'बाजारत उपलब्ध असलेले मराठी बालसाहित्य वैविध्यपूर्ण आहे का?'

समीक्षात्मक दृष्टिकोनावरील एक कार्यशाळा

एक गट म्हणून, सामायिकपणे आपण पुस्तकांकडे समीक्षात्मक दृष्टिकोनातून कसे पाहतो, या प्रश्नावर आम्ही काही वेळ विचार व चर्चा केली. यामध्ये समाविष्ट समीक्षात्मक दृष्टिकोन :

- व्यवहारात्मक दृष्टिकोन (Transactional lens)
- आनुवंशिक दृष्टिकोन (Genetic lens)
- औपचारिक दृष्टिकोन (Formal lens)
- मजकूर-ते-मजकूर दृष्टिकोन (Text-to-Text lens)
- सामाजिक-सांस्कृतिक दृष्टिकोन (Sociocultural lens)

जोडीजोडीने आम्ही प्रत्येकी एका पुस्तकावर हे दृष्टिकोन लागू करण्याचा प्रयत्न केला – पुस्तकाकडे वेगवेगळ्या दृष्टिकोनातून पाहून आणि पुस्तकाकडे समीक्षात्मक दृष्टीने पाहण्याचा अर्थ काय आहे, याबद्दलची आमची समज अधिक सखोल केली. प्रत्येक जोडीने त्यांचा अनुभव व चर्चा सर्वांसमोर मांडली. आशा आहे की या प्रक्रियेमध्ये आमची स्वतःची भूमिका आणि एकूण समज अधिक मजबूत झाली.

““या अनुभवामुळे मराठी बालसाहित्यातील विविध प्रकाशकांविषयी माझी जागरूकता वाढली आहे. मी आता मराठी पुस्तके सखोलपणे वाचू लागले आहे, मजकुरासोबतच चित्रांचेही काळजीपूर्वक निरीक्षण करते, जेणेकरून मला काही उणिवा लक्षात येतील आणि त्यावर इतरांशी चर्चा करता येईल.”
— दीक्षा

“पुस्तकांकडे समीक्षात्मक दृष्टिकोनातून पाहण्याबद्दलची माझी समज विकसित झाली आहे. विविध विषयांवरील सादरीकरणासाठी आम्ही केलेल्या विश्लेषणाच्या प्रक्रियेत याचा मला उपयोग झाला. या कार्यशाळेमुळे मराठी बालसाहित्याकडे पाहण्याचे विविध दृष्टिकोन खुले झाले आणि त्यात भर पडली. यामुळे, पुस्तकांचे समीक्षात्मक विश्लेषण करण्याचा आत्मविश्वास वाढला आहे.”
— अश्विनी

भेट दहा वर्षांनी !

चहापान आणि उर्वरित चर्चा

बुकवर्म एल इ सी कोर्से चे माजी विद्यार्थी

दिवस तिसरा : १२ एप्रिल, २०२६

पुढील टप्पे

सजग टीमने सुरू केलेल्या अभ्यासावर पुढे एकत्रितपणे काम करणे.
आणि
एकमेकांच्या संपर्कात राहाणे , माहिती देणे व वेळोवेळी मदत करणे .